**कार्यकारी अभियंता / ग-उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**दुसरा मजला, सनशाईन प्लाझा, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय**
**मार्ग, दादर (पुर्व), मुंबई- ४०००१४**

म्हाडा MHADA

**जा.क्र. काअ/ग-उत्तर/उवि- ३/E- /DIS- /२०२६ दिनांक :- १२.०६.२०२६**

**म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र**

**प्रति,**

| | | |
|---|---|---|
| **सर्व भाडेकरु/ रहिवाशी व इमारतीचे मालक, इमारत क्र. ८-८सी, २६-२६-एफ, कॉर्नर चेम्बर, उपकर क्र. ग उ ४८७८ (१), शिवाजी पार्क रस्ता क्र. ५, दादर, मुंबई.**<br><br>**DIS-** | Matwad Madressa & Masjid Trust, 217, Sadak Family, Matwad, Post. Kharel, Gandevi, Navsari, Gujrat-396430<br><br>**DIS-** | Mohamed Ebrahim Issat & oth,C/o Haji Fakir Maniyar, Maniyar Stores, 2220,Ibrahim, Rohmtula Road, Mumbai, Maharashtra 400003 (As Per BMC Repair Cess Register Postal address record)<br>**DIS-** |
| Yusuf Ibrahim Sedat & Others,The Matwad Madressa & Masjid Trust, C/o S.K. Ismail Khan & Bros,72/74, Al-madina Bldg, 1st Floor, Grant Road, X-Lane, Mumbai-07<br>**DIS-** | Yusuf Ibrahim Sedat & Others, The Matwad Madressa & Masjid Trust,Plot no.198, Shivaji Park, Road No.5, Off Gopi Tank Road, Mahim, Road, Mumbai-16.<br>**DIS-** | |

**विषय :- उपकर क्र. ग- उ ४८७८ (१), इमारत क्र. ८-८सी, २६-२६-एफ, कॉर्नर चेम्बर, शिवाजी पार्क रस्ता क्र. ५, दादर, मुंबई या इमारतीच्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना.**

**संदर्भ :-** १) मे. स्ट्रक्चरा इंजिनियरींग एल.एल. पी. तर्फे श्री. सौरभ पेडणेकर यांनी या कार्यालयास सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.
२) या कार्यालयाचे सर्वसाधारण निष्कासन सुचना पत्र क्र. DIS-७५२१०१ दि. ०९.०५.२०२५
३) या कार्यालयाचे सर्वसाधारण निष्कासन सुचना पत्र क्र. DIS-७७६१८० दि. २७.०५.२०२५
४) या कार्यालयाचे पत्र क्र. E-३२११९३५/DIS-१३७६४९२ ते १३७६४९६ दि. १४.०५.२०२६

**महोदय / महोदया,**

या कार्यालयातर्फे मे. स्ट्रक्चरा इंजिनियरींग एल.एल. पी. तर्फे श्री. सौरभ पेडणेकर यांनी विषयांकित इमारतीचा संरचनात्मक परिक्षण अहवाल केला असून इमारतीची वर्गवारी C-१ म्हणजेच To be Demolished आहे. सदर अहवालाच्या आधारे, इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्चिती करण्यात आली. या कार्यालयामार्फत संदर्भिय पत्र क्र. २,३ नुसार आपणांस निष्कासन बाबत कळविलेले आहे. अद्याप आपणांमार्फत कोणतेही कागदपत्रे मंडळास सादर झालेले नाहीत.

**प्रस्तुत प्रकरणी आपणास पुन:श्च सूचित करण्यात येते कि, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी.** आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच संदर्भ क्र. २ व ३ नुसार आपली कागदपत्रे या कार्यालयास सादर करावीत. जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देणे या कार्यालयास शक्य होईल. विषयांकित इमारतीचा विद्युत सेवा व पाणीपुरवठा खंडीत करणेबाबत या कार्यालयाकडून दि. २०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगरपालिकेस कळविलेले आहे.

वरील बाबींची पूर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.

**आपला विश्वासू ,**

**कार्यकारी अभियंता ग-उत्तर विभाग**
**मुं.इ.दु व पु.मंडळ, मुंबई**

प्रत,

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सविनय सादर.**DIS-**
- उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सादर.**DIS-**
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित. **DIS-**
- डॉ. मोहसीन लोखंडवाला, चेअरमन, गुजरात राज्य वक्फ बोर्ड, डॉ. जीवराज मेहेता भवन, ब्लॉक नं. ८, तळमजला, जुना सचिवालय, गांधीनगर, राज्य गुजरात- ३८२०१० यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता. **DIS-**
- सहाय्यक आयुक्त, ग-उत्तर विभाग, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.-- विषयांकित इमारतीचा विद्युत सेवा व पाणीपुरवठा खंडीत करणेबाबत या कार्यालयाच्या दि. २०.०६.२०२५ रोजीच्या पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. **DIS-**
- मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शिवाजी पार्क पोलिस स्टेशन, दादर, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- कार्यकारी अभियंता (इ व का), ग- उत्तर, मुंबई महानगरपालिका, खोली क्र. ३९, पहिला मजला, हरिशचंद्र येवले रस्ता, दादर (प), मुंबई -४०००२८ यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, ग-उत्तर अग्निशमन केंद्र, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण , गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी रवाना. **DIS-**
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव तथा सदर सूचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेकामी रवाना. **DIS-**
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी **DIS-**
  - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीची प्रत इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.